अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड





www.surajyadigital.com । रविवार, दि. ८ मार्च २०२६ । ▸ वर्ष : २४ वे ▸ अंक : १५८ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८


## काँग्रेस भवनासह सोशल मीडियावर कोल्हेकुई

# ज्योती खासदार झाल्या, आम्ही न्हाय पाहिल्या!

✔ सोलापूर/प्रतिनिधी

प्रा.डॉ. ज्योती वाघमारेंच्या रुपानं सोलापूरची लेक खासदार झाली. या जिल्ह्याला तिसरा खासदार मिळाला. निवडीनं सोलापुकरांना अभिमान आणि गर्व वाटला. नकारात्मक धक्के सोसणाऱ्या सोलापूरकरांना यावेळी मात्र सुखद धक्का बसला. अनवणी पायांनी फिरण्यासह भाकरीसाठीच्या संघर्षाची वाट तुडवणाऱ्या अगदी सर्वसामान्य लेकीला खासदारकी मिळाल्याबद्दल आणि बहाल केल्याबद्दल तमाम सोलापूरकरांकडून मनापासून कौडकौतुक होतंय. मात्र तुलनेत काँग्रेसचे राष्ट्रीय नेते सुशीलकुमार शिंदे आणि खासदार प्रणिती शिंदे यांच्याकडून मात्र कधीकाळच्या आपल्या कार्यकर्तीचं अभिनंदन झालं नाही याची खंत व्यक्त केली जातेय

खासदारकीचा अर्ज भरल्यानंतर पहिल्यांदाच आपल्या भूमीत परतल्यानंतर माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना प्रा. ज्योती यांनी वास्तव सांगितलं. सुशीलकुमार शिंदे आणि प्रणिती शिंदे यांचा अभिनंदनाचा कॉल आला नाही, असं सांगत त्यांनी मनातील नाराजीची भावना बोलून दाखवली. यासंबंधीच्या पोस्ट सोशल

### ...तेच भाईंनी करुन दाखवलं

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे करायचे, पानटपरीचालकाला मंत्री, भाजी विकणाऱ्याला विरोधी पक्षनेता, रिक्षा चालवणाऱ्याला शिवसेना नेता केलं. आता त्याचप्रमाणे कष्ट करणाऱ्या आई बापाच्या मुलीला खासदार करणे, हा वारसा एकनाथ शिंदेंनी चालवला आहे, असेही डॉ वाघमारे यांनी स्पष्ट केले.

(अधिक वृत्त पान ७ वर...)



सोलापूर : प्रा. ज्योती वाघमारे यांचे शहरात जंगी स्वागत करण्यात आले.

### मनात एवढा आकस का?

वास्तविक प्राध्यापक पदाच्या नोकरीवर लाथून मारुन ज्योती वाघमारेंनी काँग्रेसमध्ये एंट्री केली. शिंदे पिता-कन्येच्या नेतृत्वाला बळ देण्यासाठी दिवसाची रात्र आणि रात्रीचा दिवस करत काँग्रेसच्या शहराध्यक्षपदावरुन मोठं काम केलं. कार्यकर्ती या व्याख्येच्या पुढं जाऊन शिंदे परिवारासाठी वाघमारे झटल्या. इतकं सगळं करुनदेखील वाघमारे या राज्यसभेच्या सदस्य झाल्यानंतर त्याचं केवळ शब्दांनी अभिनंदन करायला एवढं का जात होतं अशा तिखट शब्दात सुज्ञ सोलापूरकरांनी भावना व्यक्त करताना डॉ. ज्योतींबद्दल मनात आकस आणि बेदखल करण्याची मानसिकता कशी? असाही मुद्दा उपस्थित केला गेला.

# देशात महाराष्ट्र सर्वाधिक कर्जबाजारी राज्य

## कर्जाचा बोजा ११ लाख कोटींवर

✔ मुंबई/प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्प मांडल्यानंतर राज्याच्या आर्थिक स्थितीविषयी चिंताजनक माहिती बाहेर आली आहे.चालू आर्थिक वर्षात राज्यावर ९ लाख ३७ हजार कोटींचे कर्ज असताना पुढील आर्थिक वर्षात कर्जाचा बोजा हा ११ लाख कोटींपेक्षा अधिक होणार असल्याचे सांगण्यात येते.

मुंबई महानगर क्षेत्रविकास प्राधिकरणासह विविध मंडळांच्या कर्जांचे राज्याच्या एकत्रित कर्जात समाविष्ट करण्यात आल्याने वर्षभरात पावणे दोन लाख कोटींनी कर्जात वाढ झाल्याचे अर्थ खात्याच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

### तुटीचा कल कायम

पुढील आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प हा ४०,५५२ कोटींचा तुटीचा आहे. गेले काही वर्षे तुटीच्या अर्थसंकल्पाचा कल कायम आहे.२०२०-२१ : ४१,१४२ कोटी, २०२१-२२ : १६,३७४ कोटी, २०२२-२३ : १,९३६ कोटी, २०२३-२४ : १३,७५४ कोटी, २०२४-२५ : २९,९९५ कोटी. २०२५-२६ : ३७,०५५ कोटी

राज्याच्या स्थूल राज्य उत्पन्नाच्या तुलनेत कर्जाचे प्रमाण हे २५ टक्क्यांच्या आत असावे, असे निकष आहेत. राज्यावरील कर्जाचा बोजा हा पुढील आर्थिक वर्षाच्या अखेरीस २०.३८ टक्के होईल, अशी आकडेवारी अर्थसंकल्पाच्या कागदपत्रांमध्ये देण्यात आली आहे. गेल्या दहा वर्षांत कर्जाचे हे सर्वाधिक प्रमाण आहे.

चालू आर्थिक वर्षात राज्यावरील कर्जाचा बोजा हा ९ लाख ३७ हजार कोटी असेल. पुढील आर्थिक वर्षात हेच कर्ज ११.०२ लाख कोटी होणार आहे. यापैकी ९० हजार कोटींचे कर्ज हे केंद्र सरकारचे असून, ती रक्कम केंद्र सरकार फेडणार असल्याने कर्जाचे प्रमाण

(अधिक वृत्त पान ७ वर...)




## जन्मदर वाढीसाठी नायडूंचा अजब फंडा

# तिसऱ्या अपत्यासाठी देणार २५ हजार



✔ हैदराबाद

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी त्यांच्या राज्यात मुला-मुलींचा जन्मदर वाढवण्यासाठी एक अजब शक्कल लढवली आहे. जे कुटुंब तिसऱ्या अपत्याला जन्म देईल, त्या फॅमिलीला २५ हजार रूपयांचे अनुदान दिले जाणार आहे तसेच मुलांचे बारावीपर्यंतचे शिक्षण मोफत केले जाणार आहे. नायडू यांनी ही घोषणा विधानसभेत केली. त्यांच्या या संकल्पनेची देशातील सामाजिकस्तरावर भलतीच चर्चा रंगली आहे.

जगातील सर्वात मोठी लोकसंख्या असलेला देश म्हणून भारताने चीनला मागे टाकत पहिले स्थान पटकावले आहे. १४० कोटी लोकसंख्या असलेल्या भारतात नेहमीच मुले जन्माला घालण्यावरुन चर्चा होत असते. कुणी हिंदूंनी १० मुले जन्माला घातली पाहिजे, असे म्हणतो, तर कुणी ४ मुले जन्माला घालण्याचा सल्ला देतो. विशेष म्हणजे

(अधिक वृत्त पान ७ वर...)


